## नियमीत दिवाणी मुकदमा क्र १४/१९ मधील निशाणी २५ वरील आदेश

(दिनांक ०४.०१.२०२०)

०१. सदरचा अर्ज हा प्रतिवादी नं. ७ यांनी त्यांचे विरुध्द झालेला एकतर्फा चौकशीचा हुकूम रद्द बातल होवून कैफियत स्विकारण्यासाठी दाखल केला आहे.

०२. प्रतिवादी नं. ७ यांच्या म्हणण्या प्रमाणे, त्यांना दाव्यासबंधीची महत्वाची कागदपत्रे न मिळाल्यामुळे आणी प्रतिवादी हा अमेरीका येथे गेलेला होता त्यामुळे मुदतीत कैफीयत दाखल करू शकले नाहीत त्यामुळे त्यांचेविरूध्द विनाकैफीयत हुकुम झालेला आहे. न्यायाचे दृष्टीने प्रतिवादीं विरूध्द झालेला विना कैफियत आदेश रद्द करून कैफियत स्विकारण्यात यावी अशी विनंती केलेली आहे.

०३. या अर्जास वादीने म्हणणे दाखल करून आक्षेप घेतला की अर्जात नमुद केलेले कारण खोटे आहे तसेच वादीस शारीरीक, मानसिक त्रास देवुन आर्थीक नुकसान देणेच्या उद्देशाने मुदतीत लेखी निवेदन दिलेले नाही. सबब, अर्ज खर्चासह नामंजुर करावा अशी विनंती केलेली आहे.

०४. अर्जातील कथने पाहता खालील मुद्दे उपस्थित होतात व त्या प्रत्येक मुदयास आणि निष्कर्षास अनुसरुन उत्तर मी निम्न प्रकारे देत आहे.

| | ***मुद्दे*** | ***निष्कर्ष*** |
|---|---|---|
| ०१ | प्रतिवादी नंबर ७ यांनी मागणी केल्या प्रमाणे कैफियत दाखल करुन घेणे आवश्यक आहे का ? | *..होय.* |
| ०२ | कोणता आदेश? | *..अंतिम आदेशाप्रमाणे.* |

## का र ण मि मां सा

**मुद्दे क्रमांक १ व २:—**

०५. उभयंताच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. संपुर्ण दाव्याचे आणी रोजनाम्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की प्रतिवादी नं. ७ यांचेविरूध्द यांचे विरूध्द विनाकैफियत चौकशीचा' चा आदेश झाला आहे. प्रस्तुतचा दावा हा सरस निरस मानाने

वाटप होवुन पृथक कब्जा मिळण्यासाठी आणी डिक्लेरेशनचा असल्यामुळे सदरचा दावा गुणावगुणावर चालण्यासाठी आणि प्रतिवादी नं. ७ यांचे महत्वपुर्ण हक्क सदरच्या दाव्यात समाविष्ट असल्यामुळे प्रतिवादीची कैफियत अभिलेखावर येणे गरजेचे आहे. तसेच प्रत्येक व्यक्तीला त्याचे म्हणणे मांडण्याची पुरेशी संधी दिली पाहिजे असे नैसर्गिक न्यायदानाचे तत्व आहे. नैसर्गिक न्यायदानाचे तत्व हे प्रतिवादी यांच्या पक्षात आहे. परंतू, प्रतिवादी नं. ७ यांनी कैफियत वेळेत न दिल्याने सदरच्या दाव्याचे लांबणीवर पडले आहे म्हणून प्रतिवादी नं. ७ यांना आदेशित करण्यात येते की, त्यांनी वादींना कॉस्ट/खर्च म्हणून रक्कम रु ३००/— दयावे. या सर्व बाबीचा विचार करुन मुद्या क्रमांक ०१ चे उत्तर होकारार्थी देण्यात येते. मुद्या क्र २ च्या उत्तरा दाखल वरील चर्चेस अनुषंगून खालील आदेश पारित करण्यात येतो.

**<u>आ दे श</u>**

०१. अर्ज मंजूर करण्यात येते.

०२. प्रतिवादी नं. ७ यांनी वादींना कॉस्ट रु. ३००/— दिल्यानंतर त्यांची कैफियत स्विकारण्यात यावी.

०३. वरील आदेशा प्रमाणे हा अर्ज निकाली काढण्यात येतो.

स्वाक्षरीत/—

**(श्री. राजेश बी. खंदारे)**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश,क. स्तर, तुळजापुर.

दिनांक : ०४/०१/२०२०